## प्रकरण पहिले

## महात्मा फुले - जडणघडण

ज्यावेळी एखादा विचार मांडला जातो त्या विचारावर तत्कालिन परिस्थितीचा प्रभाव अनिवार्यपणे पडतो. कारण विचार निर्मिती घडण्याच्या प्रक्रियेमध्ये सभोवताली घडणा-या घटना ब-याच वेळा कारणीभूत ठरत असतात.

सर्वसामान्यपणे विचार मांडला जाणे आणि प्रश्नांचा गांभीर्याने विचार करुन, त्या प्रश्नांची विविधांगे समजावून घेऊन त्या संबंधात विचार मांडणे यात निश्चित असा फरक असतो. त्यामुळे दुस-या प्रकारे मांडले गेलेले विचार ठसीव स्वरुपाचे असतात असे मानावयास हरकत नाही.

काकतालीय न्याय पध्दतीने प्रासंगिक स्वरुपास अनुसरुन मांडलेले विचार तत्कालिन परिस्थितीवर प्रभाव टाकून जातात. तथापी समाज जीवन कालौघाबरोबर बदलत असल्याने असे विचार चिरकाल मार्गदर्शक ठरतातच असे नाही. तथापी समाज जीवनाचा सर्वांगिण विचार करुन मांडलेले विचार कालौघाबरोबर नाहिसे न होता शतकानुशतके समाजास मार्गदर्शक ठरु शकतात.

वैचारिकतेच्या पातळीवर सामान्यत: असे आढळते की, विचारवंताने मांडलेल्या विचाराचा आधार घेऊन त्या दिशेने समाज विकास साधता यावा यासाठी कार्यकर्ते काम करीत असतात. ढोबळमानाने बोलावयाचे झाले तर फारच कमी विचारवंत कार्यकर्ते आणि फारच कमी कार्यकर्ते विचारवंत असतात. कार्यकर्ता आणि विचारवंत असा दुहेरी मिलाफ असलेली असामान्य माणसे विरळीच असतात.

यावरून विचारवंत आणि कृतिशील विचारवंत असा भेद करता येऊ शकेल. कृतिशील विचारवंताचे वैशिष्ट्य हे असते की मुळात तो कार्यकर्ता असतो. तथापि ज्या सामाजिक वास्तवात आपण काम करतो त्या वास्तवातील उणीवा दूर करता याव्यात यासाठी लोकप्रबोधन घडावे म्हणून तो विचार मांडित राहतो आणि ते मांडलेले विचार कसे योग्य आहेत ते कार्यामधून सिध्द करून दाखवत असतो. त्यामुळे अशा विचारांना प्रयोगसिध्दता लाभते. म्हणूनच त्यांना आपण कृतिशील विचारवंत म्हणून ओळखतो. कृती आणि उक्ती यांचा सुंदर संगम अशा विचारवंताचा स्थायीभाव असतो. महात्मा जोतीराव गोविंदराव फुले हे या कृतिशील विचारवंताचे प्रतिनिधी आहेत. ते कृतिशील विचारवंत, क्रांतिकारक विचारवंत, आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक आहेत.

महात्मा फुले यांच्या विचारसरणीची बैठक समता आणि न्याय या तत्वांवर आधारीत असून या तत्वांवर आधारीत समाजरचना अस्तित्वात आणण्याचा ध्येयवाद त्यांनी अंगिकारला होता. माणसाचे माणूस म्हणून असलेले हक्क कृत्रिम मार्गांनी कोणीही हिरावून घेऊ शकत नाही ही त्यांची भूमिका होती. मानवतावाद हा त्यांच्या विचारांचा पाया होता आणि मानवतावाद समतेशिवाय अशक्य असतो ही त्यांची धारणा होती. यामुळेच १९ व्या शतकातील तत्कालिन समाजव्यवस्थेतील विषमतेवर प्रखर हल्ला त्यांनी चढवला असला तर त्यात वावगे असे काहीच नाही. जोतीरावांचा विशेष रोख मनुष्यनिर्मित रूढीजन्य विषमतेवर दिसून येतो. यामुळेच ते लिहितात -

" मानव सारिखे निर्मीके निर्मीले ।।
कमी नाही केले ।। कोणी एका ।। "[१]

चातुर्वर्ण्याच्या चौकटीत जातीव्यवस्थेस अनुसरून मानवा मानवात निर्माण केलेला भेदभाव म्हणजे थोतांड असून मनुष्य हा आपल्या अंगी असलेल्या गुणांनी श्रेष्ठ ठरू शकतो. परंतु गुणश्रेष्ठत्वाला बाजूला सारून जन्मसिध्द श्रेष्ठत्वाला प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या समाजात आपोआपच जन्माने कनिष्ठ ठरलेल्या माणसांना जी अमानुष वागणूक मिळत होती त्या समाजाच्या व्यथांना वाचा फोडण्याचे काम जोतीरावांना करावे लागले. " कर्जबाजारीपणापायी हैराण झालेल्या शेतकऱ्यांची गाऱ्हाणी त्यांनी वेशीवर टांगली. खेडयापाडयातील या कष्टकऱ्यांचे अज्ञान व दारिद्रय हे ईश्वरनिर्मित नसून त्यांचे मूळ आपल्या समाजव्यवस्थेत आहे हे त्यांना बरोबर उमगले होते. म्हणून या व्यवस्थेतील धर्माधिष्ठित बौध्दिक गुलामगिरी, सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषण यांकडे त्यांनी प्रथमच लोकांचे लक्ष वेधले."[२] त्याचबरोबर " रूढीप्रामान्य आणि सामाजिक विषमता यांना दैवी अधिष्ठान मिळवून देणाऱ्या धर्मसंस्थेवरच त्यांनी हत्यार उपसले. दलित-शोषित वर्गाचा कैवार घेऊन त्यांना नैसर्गिक मानवी हक्क प्राप्त करून देण्यासाठी ते जन्मभर झगडले."[३]

जडणघडण :

कोणत्याही व्यक्तीच्या जडणघडणीमध्ये भूत आणि वर्तमान-कालीन सामाजिक जीवनाचा परिणाम होत असतो. भूतकालीन सामाजिक जीवनामधील घडामोडींच्या संदर्भानुरूप व्यक्तीच्या जीवनाची जडणघडण प्रथमावस्थेत होत राहते आणि त्यामुळे वर्षानुवर्षे चालत आलेल्या रीतीरिवाजाप्रमाणे त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडत जाते. व्यक्तीचे वय जसे वाढत जाईल त्याप्रमाणे वर्तमानकालीन समाजाची ओळख त्यास होऊ लागते आणि तदनंतर भूत आणि वर्तमान या दोहोंचा परिणाम त्याच्या जीवनावर पडतो आणि त्यामधून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. भूत आणि वर्तमान या दोहोंचा सहज पध्दतीने स्वीकार करणारी माणसे प्रवाहाबरोबर जीवनक्रम व्यतीत करतात. परंतु भूतकाळातील

समाज जीवनाकडे विचारपूर्वक पहात आणि वर्तमानकालीन समाज जीवनाचे परिशिलन प्रश्नार्थक मनाने करण्याचा प्रयत्न करणा-या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण परंपरेने चालत आलेल्या समाज व्यवस्थेला छेद देत होत असते.

महात्मा फुलेपूर्व महाराष्ट्रात जे समाजजीवन होते त्यात नित्यनेमाने काही बदल घडत होते. तथापी समाज व्यवस्थेचा मुलाधार कायम होता. त्यामुळे अशा बदलांना फारसे महत्व नसते. " सामाजिक जीवनात जेव्हा अमूलाग्र व अर्थपूर्ण बदल होतो, तेव्हा त्यास क्रांती असे म्हणतात. अशात-हेचे मूलगामी सर्वंकष परिवर्तन पेशवाई अखेरपर्यन्त होऊ शकले नव्हते."[४] याचाच अर्थ असा की पेशवाईपर्यन्त चालत आलेल्या समाजव्यवस्थेचा परिणाम पेशवाईनंतरच्या समाज व्यवस्थेवरही पडलेला होता. पेशवाईनंतरचा काळ म्हणजे ब्रिटीश काळ होय.

ब्रिटीशपूर्व महाराष्ट्रीय समाज जीवनामध्ये धर्मसंस्था आणि धर्मसंस्थेच्या नावावर निर्माण केलेल्या जाती संस्थेला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले होते आणि या दोन्हीही संस्था स्थिर स्वरूपाच्या होत्या. हिंदूधर्मशास्त्रामध्ये समाजाची उत्पत्ती सांगितली होती आणि त्यानुसार जीवनधर्म बनतो ही भावना लोकांच्या मनात रूजली होती आणि त्यानुसार जीवनक्रम सुरू होते. परंतु जे धर्मशास्त्रात सांगितले आहे त्याचा आधार कोणता याबाबत प्रश्न करण्याइतका समाज सुज्ञ नव्हता.

हिंदू धर्मशास्त्रात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण सांगितले असून त्यांचीवैशिष्टये अशी होती :

१) समाजात चार वर्ण आहेत.
२) प्रत्येक वर्णाचे वेगळेपण गुणभिन्नता मूलक आणि कर्तव्य भिन्नता मूलक आहेत.

३) एकाच शरीराचे भिन्न-भिन्न अवयव असतात. त्याप्रमाणे वर्ग हा चातुर्वर्ण्याचा अवयव आहे.[५]

या वर्णांची उत्पत्ती " जग निर्माण करणाऱ्या परमेश्वराने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांना अनुक्रमे स्वत:च्या मुखातून, बाहूपासून, मांड्यापासून व पायापासून सुखसमृध्दिसाठी निर्माण केले आहे. " मनुस्मृतीत अशी सांगितली होती.[६] आणि ती परिदृढ झाली होती.

एवढ्यावरूनच हे सांगणे थांबले नाही तर प्रत्येक वर्णाची कर्तव्यकर्मे निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार -

१) अध्यापन, अभ्यास, यज्ञयाग करणे, पुरोहितपण करणे, दान करणे ही धर्मकर्मे ब्राह्मणांस वाटून दिली होती.

२) लोक संरक्षण, दान करणे, उपभोग्य वस्तुपासून परावृत्ती ठेवणे ही कर्तव्ये क्षत्रियाची होती.

३) गुरे पाळणे, दान करणे, यज्ञयाग करणे, व्यापार करणे, व्याजाने पैसे लावणे, शेती करणे ही कामे वैश्याची होती.

४) वरील तिन्ही जातींची बिनतक्रार सेवा करणे हे एकच काम शूद्राचे होते.[७]

यामुळे जातीव्यवस्था जन्मसिध्दता पावली होती आणि जीवनाचा केंद्रबिंदू धर्म बनल्याने ती अपरीवर्तनीय बनली होती. स्थितीशिलता हा जीवनाचा स्थायीभाव बनला होता. या व्यवस्थेला छेद देणारे मनही निर्माण होऊ शकत नव्हते. कारण त्यास जनतेचा अज्ञानीपणा कारणीभूत होता. धर्मव्यवस्थेने विद्या संपादन करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मण जातीस दिल्याने बहुसंख्य समाजास धर्माची सत्य बाजू कळणे अशक्य होते आणि त्यामुळे ब्राह्मण वर्गच सर्वश्रेष्ठ बनला आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्या बाबतीत जे घडते ते ईश्वरेच्छेमुळेच घडते ही भावना इतरांची बनली होती.

अशा काळात जोतीराव गोविंदराव फुले यांचा जन्म १८२७ ला झाला. जोतीराव एक वर्षाचा असेल नसेल तोच त्याची आई चिमणाबाई वारली. त्या काळात शिक्षण ब्राह्मणाखेरीज इतर जातींनी संपादन करावयाचे नसते अशी समजूत होती. तरीही गोविंदरावांनी वयाच्या सातव्या वर्षी जोतीबास शाळेत घातले. तथापी त्यांच्या शिक्षणात ३-४ वर्षातच खंड पडला आणि गोविंदरावांनी ब्राह्मण कारकूनाच्या कुसल्ल्यामुळे[८] त्यास शाळेतून काढून टाकले. त्यामुळे जोतीराव आपल्या घराच्या बागेत काम करू लागले. या दरम्यान गोविंदरावांनी जोतीरावाचे लग्न कावडी येथील झागडेपाटील यांच्या कन्येशी लावून टाकले (सन १८४०).

गोविंदरावांच्या शेजारी गफारबेग मुनशी नावाचे एक मुसलमान विद्वान रहात होते. त्यांनी आणि मि. लिजिटसाहेब यांनी गोविंदरावांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिल्याने १८४१ ला जोतीरावांचे शिक्षण स्कॉटीश मिशनच्या इंग्रजी शाळेत सुरू झाले. या शिक्षणामुळे जोतीरावांच्या चिकित्सक वृत्तीस चालना मिळाली. या काळात सदाशिवराव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर व सखाराम यशवंत परांजपे हे त्यांचे जीवलग मित्र बनले.[९] आणि जोतीरावाच्या कार्यात त्यांनी अखेरपर्यन्त त्यास साथ दिली.

१८४८ साल म्हणजे जोतीरावांचे २१ वर्षे वय असे म्हणता येईल. यावेळी जोतीरावांचे स्कॉटीश शाळेत झालेले शिक्षण, केलेले वाचन आणि त्यावरील चिंतन यामुळे त्यांचे मन वैचारिकदृष्टया परिपक्व बनत चालले होते. या काळातच त्यांना अज्ञानमूलक आणि अंध धर्मश्रद्धेचा फटका बसला आणि त्यांच्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले. १८४८ ला त्यांच्या एका ब्राह्मण मित्राचे लग्न होते. त्याच्या निमंत्रणावरून जोतीराव त्या लग्नास गेले असता सनातनी ब्राह्मणांनी जोतीरावांची शूद्र म्हणून

हेटाळणी केली. याबाबत धनंजय कीर लिहितात की संतापाने बेभान झालेल्यापैकी एक ब्राह्मण जोतीच्या अंगावर खेकसून म्हणाला, " ब्राह्मणांशी रस्त्यातून चालायला तुला धारिष्ट तरी कसं झालं ? अरे शुद्रा, तू जातीपातीची सगळी बंधनं आणि रीतीरिवाज धुडकावून आमचा असा अपमान कसा करतोस ? तू आमच्या बरोबरीचा आहे असे समजतोस की काय ? असं वागण्यापूर्वी तू शंभर वेळा विचार करावयास पाहिजे होतास. चल हट मार्ग अन चालू लाग सर्वांच्या मागून. अलीकडं लोक अगदीच बेताल आणि बेशरम झाले आहेत. जातिपातीची मर्यादा ध्यानातच ठेवीनासे झाले आहेत. हा इंग्रज राजवटीमुळे हे लोक मारीच उध्दट होत चालले आहेत."[१०]

जोतीरावांना हे बोलणे झोंबणे स्वाभाविक होते परंतु त्याचबरोबर ते अंर्तमुख झाले आणि हे सर्व घडते, ते सर्व निमुटपणे सहन केले जाते. यास कारण बहुजन समाजाचे अज्ञान आहे हे विचारांअंती त्यांना पटले.

लोकांमधील अज्ञान दूर करून त्यांच्यावर लादल्या गेलेल्या कृत्रीम स्वरुपाच्या धार्मिक गुलामगिरीच्या शृंखला तोडावयाच्या असतील तर त्यांना सज्ञान करणे, त्यांना सत्यधर्म सांगणे यास पर्याय नाही आणि त्यासाठीचा मार्ग म्हणजे शिक्षणास पर्याय नाही हे जाणून जोतीरावांनी आपले विचार कृतीत आणण्याचा चंग बांधला. स्त्री, शुद्रादि अतिशूद्रांची गुलामगिरी शिक्षण दिल्याने कमी होऊ शकेल या भावनेने त्यांनी १८४८ ला पुण्यात बुधवार पेठेतील भिडयांच्या वाडयात मुलींची शाळा स्थापन केली. ही महाराष्ट्रातील पहिली शुद्रादि अतिशुद्रांसाठीची मुलींची शाळा होय.[११] या शाळेत शिकविण्यास शिक्षक मिळेना म्हणून सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका म्हणून काम करण्याचे पत्करले.

तद्नंतर १८५१ मध्ये रास्ता पेठेत चिपळूणकरांच्या वाड्यात मुलींच्या शाळेची स्थापना केली आणि स्वत: जोतीराव विनावेतन दिवसातून चार तास शिकवत व सावित्रीबाईही शिकवत.[१२] अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी जोतीरावांनी एक शाळा पुण्याच्या नाना पेठेत १८५१ ला सुरू केली.[१३] त्याच बरोबर १८५५ ला एक रात्रशाळाही सुरू केली.[१४] १८५८ ला शाळांच्या व्यवस्थापन मंडळातून फुले यांनी निवृत्ती घेतली. तथापी बहुजन समाजाच्या शिक्षणासंबंधी त्यांचा विचार सतत चालूच होता हे त्यांनी १९ आक्टोबर, १८८२ ला हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनामुळे स्पष्ट होते.[१५]

समाजातील ` स्त्री ` हा घटक जोतीरावांच्या परिवर्तन चळवळीतील महत्वाचा घटक होता. स्त्री शिक्षणाची त्यांनी सुरुवात त्यादृष्टीने केली होतीच. तथापी एवढ्यावर स्त्रियांचे प्रश्न संपणारे नव्हते. बालविवाहाच्या पध्दतीला बळी पडणाऱ्या बालविधवांच्या प्रश्नाने त्यांचे लक्ष वेधून घेतले. स्त्रिचा काहीही दोष नसताना तिने आयुष्यभर विधवा म्हणून काढावे याची चीड जोतीरांवाना येत होती. यावर उपाय म्हणून त्यांनी पुनर्विवाहाची चळवळ हाती घेतली आणि १८६४ ला पुण्यास गोखल्याच्या बागेत शेणवी जातीत पहिला विवाह घडवून आणला.[१६] तसेच अनाथ व आडमार्गाचे पाऊल पडल्याने गरोदर राहिलेल्या विधवांसाठी १८६३ ला बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. या कामात जोतीरावाना लोकहितवादी, रा. भांडारकर, रा.ब. मदन श्रीकृष्ण, रा. नवरंगे, रा. परमानंद व रा. तुकाराम तात्या पडवळ यांची बरीच मदत झाली.[१७]

धार्मिक दांभिकपणाचा बळी समाजाचा फार मोठा हिस्सा बनला होताच. त्यात समाजातील शूद्रांचा स्पर्शही, नव्हे तर सावलीही नाकारला गेलेला अस्पृश्य समाज होता. अशा समाजाला आपलेसे करून त्यांच्यात माणुसकी निर्माण करण्याचे कृतिशील पाऊल १८६८ ला

आपल्या घरचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करून टाकले.

या प्रकारे समाजात काम करीत असताना समाज परिवर्तनाच्या चळवळीमधील अडीअडचणी जोतीरावांच्या लक्षात पूर्णांशाने येऊ लागल्या होत्या. प्रस्थापित गुलामगिरी विरूध्दचा लढा यशस्वी करून शुद्रातिशूद्रांना माणुसकीचे जीवन मिळावयाचे असेल तर एकटयाने प्रयत्न करून चालणार नाही तर त्यास संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले पाहिजे ही भावना जोतीरावांच्या मनात बळावत चालली होती आणि त्याचे फलस्वरूप २४ सप्टेंबर, १८७३ ला स्थापन झालेला ' सत्यशोधक समाज ' होय. सत्यशोधक समाजाची स्थापना करताना तीन तत्वे प्रधान मानली होती.

१) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्विकार, निर्गुण व सत्यरूप आहे व सर्व मनुष्य प्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.

२) ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईस संतुष्ट करण्यास अगर बापास विनविण्यास जशी त्रयस्थ दलालाची जरूरी नसते, त्याप्रमाणे सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ती करण्यास भट दलालाची आवश्यकता नाही.

३) कोणीही जातीने श्रेष्ठ नसून फक्त गुणाने श्रेष्ठ ठरतो.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेने जोतीरावांचे समाज परिवर्तनाचे काम सोपे झाले.

कामगार हा घटकही शोषीतांपैकी एक होता. त्यांचीही संघटना जोतीरावांनी नारायण मेघाजी लोखंडे यांच्या सहकार्याने उभी केली. त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी ' दीनबंधु ' नावाचे वर्तमानपत्रही ते चालवत होते.

जोतीराव १८७६ ते १८८२ या सहा वर्षांच्या कालावधीत पुणे नगरपालिकेचे सभासद होते. या संस्थेतील त्यांची कामगिरी पाहिली की,

जिथे जिथे संधी मिळेल तिथे तिथे गोरगरिबांच्या हितसंबंधाची जपणूक करण्यास ते कसे तत्पर असत याची प्रचिती येते.

जोतीरावांचा जीवनक्रम आणि त्यामधील ठळक घटना पाहता त्यांचे कार्य दु:खितांसाठी होते, शूद्रातिशूद्रांच्या उन्नतीसाठी होते, धार्मिक गुलामगिरी झिडकारण्यासाठी लोकांची मानसिकता घडवणारे होते हे स्पष्ट होते. त्यांच्या कार्याने लोक प्रभावीत होत होते. त्याचाच परिणाम ११ मे, १८८८ च्या मुंबई येथील सभेत दिसून आला. या दिवशी मुंबई शहरातील नागरिकांनी कोळीवाडा हॉलमध्ये एक जंगी सभा बोलावली होती. या सभेत लोकांनी जोतीरावांना ` महात्मा ` ही पदवी बहाल केली.

जोतीरावांची वैचारिक जडणघडण :

महात्मा जोतीराव फुले यांचा १८२७ ते १८९० हा जीवनपट पाहिला तर प्रतिकूल परिस्थितीला समर्थपणे सामोरे जाण्याची शक्ती त्यांच्याकडे होती हे स्पष्टपणे जाणवते. त्याच बरोबर शतकानुशतके अज्ञान आणि अंधकाराचे जीणे धार्मिक आंधळेपणामुळे आणि विद्याहिनतेमुळे जगणाऱ्या शूद्रातिशूद्रांच्यामध्ये चैतन्य निर्माण करण्याची त्यांची वैचारिक दृष्टी तयार होण्यास जे घटक कारणीभूत झाले त्यामध्ये पेशवाईचा अंत आणि इंग्रजी राजवट आणि त्याच बरोबर महाराष्ट्र जीवनात निर्माण झालेल्या नव प्रेरणा आणि नवे विचारप्रवाह यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो.

१९ व्या शतकामध्ये पेशवाईच्या अंतानंतर ब्रिटीश शासनसत्ता अस्तित्वात आली. राज्यकारभाराच्या सोयीसाठी त्यांनी इंग्रजी शिक्षणाची सुरूवात केली. त्यास तत्वत: सर्व जातींच्या मुलांचा समावेश करण्याचे धोरण ब्रिटीशांचे होते. अर्थातच ब्राह्मण वर्गाने यास विरोध चालू केला. परंतु या धोरणामुळे शिक्षणाचे महत्व बहुजन समाजास थोडया-

फार प्रमाणात कळू लागले आणि परिणामत: बहुजन समाजातील काही लोक शिकू लागले.

जोतीराव ज्या कालखंडात कार्य करीत होते त्या कालखंडात महाराष्ट्रात नवे विचारप्रवाह कार्यरत होत होते. बाळशास्त्री जांभेकर यानी ` दर्पण ` हे वृत्तपत्र सुरू करून कालबाह्य कल्पनांचा त्याग करणे कसे योग्य आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न सुरू केला होता. परमहंस सभा १८५० ला स्थापन झाली आणि त्यांनी धर्मतत्वविचारांची आधुनिक पध्दतीने मांडणी करण्याचा प्रयत्न सुरू केला. लोकहितवादींनी आपल्या शतपत्रा-मधून ` कालाचा प्रवाह पाहून, कालमान ओळखून आपल्या विचारात आणि आचारात सुधारणा करा ` हा संदेश देण्याचा प्रयत्न केला. " जुन्या विद्या, व्यवसाय, धर्मकल्पना, सामाजिक संस्था, नेतृत्व या सर्वगोष्टी आता कालबाह्य व निकामी झाल्या आहेत. त्यांना त्वरित सोडचिठ्ठी देऊन नवीन गोष्टी डोळसपणाने आत्मसात केल्याखेरीज बदललेल्या जमान्यात आपला निभाव लागणार नाही हे त्यांनी वारंवार निक्षून सांगितले आहे."[१८] सामाजिक प्रश्नांकडे लोकहितवादी धर्मनिरपेक्ष दृष्टीकोनातून पहात होते.

या काळातच जोतीरावांनी सार्वजनीक जीवनात प्रवेश केला. स्कॉटीश मिशनच्या शाळेत शिक्षण घेत असताना समाज जीवनाचे निरीक्षण करण्याची संधी त्यांना मिळाली. ख्रिस्ती धर्माच्या प्रसार करणाऱ्या धर्मोपदेशकांच्या कार्यपध्दतीचा परिणाम जोतीरावांच्या मनावर पडला होता. त्यामुळे हिंदू धर्मातील अनेक देवतांची उपासना, जातीभेद, अस्पृश्यता आणि विधिनिषेधांचे अवडंबर या गोष्टी त्यांना मनापासून त्याज्य वाटत होत्या. या दिशेने जोतीरावांचे चिंतन सुरू झाले.

जोतीरावांच्या विचाराची जडणघडण होत असताना त्यास आवश्यक पोषक वातावरण त्या काळात नव्या विचारप्रवाहामुळे निर्माण होत असताना जोतीरावांच्या विचारांना दूरगामी वळण मिळाले ते थॉमस पेन यांनी लिहिलेल्या ग्रंथाच्या अभ्यासानंतर. थॉमस पेन हा एकेश्वरवादी होता. " त्यांचा झगडा दुहेरी होता. एकीकडे लोकांची फसवणूक करणाऱ्या स्वार्थी धर्मसेवेवर ते हल्ला चढवत होते, तर दुसरीकडे नास्तिकतेशी त्यांना मुकाबला करावयाचा होता. अशा दोन्ही आघाडया सांभाळून पुन्हा विशुध्द धर्मभावनेचा आशय त्यांना लोकांच्या गळी उतरवावयाचा होता. त्यामुळे जोतीरावांना त्यांची जीवनदृष्टी अधिक स्वागतार्ह वाटली."[१९]

थॉमस पेन यांचे विचारांचे सार स्पष्ट करावयाचे झाले तर असे सांगता येईल -

१) सर्व मानव समान आहेत.

२) ईश्वर एकच आहे. धर्म ही ईश्वरोपासकाची खाजगी वैयक्तिक बाब आहे.

३) जगाचा निर्माणकर्ता परमेश्वर आणि त्याला अनन्यभावे शरण जाणारा माणूस यांच्यात कुणाही मध्यस्थाची गरज नाही.

४) जगात असलेले विविध धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत नाहीत.

५) माणसामाणसातील देश, वंश, पंथ, दर्जा, लिंग असे भेदभाव ईश्वरी योजनेशी विसंगत आहेत.

६) ईश्वराने जर कोणता ग्रंथ तयार केला असेल तर सृष्टी हा तो ग्रंथ होय.

थॉमस पेन यांच्या या विचारांचा प्रभाव जोतीरावांवर पडल्याने मानवतावादाचा पुरस्कार जोतीरावांनी अखंडपणे केला होता त्यास मरीव

पाठिंबा मिळाला. त्यांचे विचार अधिक मूलगामी आणि निकोप बनू शकले. हेच विचार महाराष्ट्राच्या समाज जीवनाच्या संदर्भात त्यांनी आपल्या लिखाणातून मांडल्याचे आढळून येते.

" मानवाचे धर्म नसावे अनेक । निर्मीक तो एक जोती म्हणे "[२०]

" सर्व साक्षी जगत्पती । त्याला नको मध्यस्थी ।।"[२१]

" निर्मीकाचा धर्म सत्य आहे एक । मांडणे अनेक व कशासाठी "[२२]

" मानव सारिखे निर्मिके निर्मीले ।
कमी नाही केले । कोणी एका ।।"[२३]

अशी कितीतरी उदाहरणे जोतीरावांच्या लिखाणात सर्वत्र विखुरलेली सापडतात. तात्पर्य असे की जोतीरावांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत थॉमस पेन यांच्या विचारांस बरेच वरचे स्थान प्राप्त होते. त्यांचा विचार मानवतावादाने ओतप्रोत भरलेला आणि म्हणूनच हिंदू धर्मातील कालबाह्य, टाकाऊ, अमानवी रितीरिवाजाविरोधी चिड आणणारा आणि त्या प्रवृत्तींचा बिमोड करण्यासाठी क्रांतीप्रवण पध्दतीने त्यावर प्रखर हल्ला चढविणारा असा होता हे मान्य करावे लागते.

## संदर्भ

१) फडके य.दि. (सं.) - "महात्मा फुले समग्र वाङ्.मय," महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, ४ थी आवृत्ती, पृ. ५५०. (टीप - यापुढे सर्वत्र या ग्रंथाबाबतचे संदर्भ ` समग्र वाङ्.मय ` अशा पध्दतीने मांडले आहेत.)
२) सरदार गं.बा. - "महात्मा फुले - व्यक्तित्व आणि विचार," पृ.१.
३) किंचा - पृ. १-२.
४) किंचा - पृ. ३.
५) जोशी महादेवशास्त्री - भारतीय संस्कृति कोश, खंड ३, पृ. ३६८.
६) गवळी पी.ए. - "पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता," पृ.३८.
७) किंचा.
८) कीर धनंजय - "महात्मा जोतीराव फुले," पृ. १३.
९) पाटील पंढरीनाथ - "महात्मा जोतीराव फुले," पृ. ५.
१०) कीर धनंजय - पूर्वोक्त, पृ. २०.
११) समग्र वाङ्.मय - पृ. ७२९.
१२) कीर धनंजय - पूर्वोक्त, पृ. ३५.
१३) पाटील पंढरीनाथ - पूर्वोक्त, पृ. १९.
१४) समग्र वाङ्.मय, पृ. ७२९.
१५) किंचा, पृ. ७१५-७२५.
१६) पाटील पंढरीनाथ - पूर्वोक्त,पृ.३६.
१७) किंचा, पृ. ३६-३७.
१८) सरदार गं.बा. - पूर्वोक्त, पृ. ३१.
१९) किंचा, पृ. ५४.
२०) समग्र वाङ्.मय, पृ. ५३५.
२१) किंचा, पृ. १९२.
२२) किंचा, पृ. ५२७.
२३) किंचा,पृ. ५५०.

## प्रकरण दुसरे

## जोतीरावांच्या वाङ्.मयाचा परिचय

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय जोतीराव फुले यांचे शेतीविषयक विचार असा आहे. ` शेती ` यासंबंधीच्या अनुषंगाने विचार केला जाता शेती आणि शेती करणारा शेतकरी या दोन्ही घटकांच्या संदर्भात विचार करणे अपरिहार्य ठरते.

शेतकरी हा जोतीरावांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. जोतीरावांनी जे कार्य केले त्यामध्ये प्रामुख्याने शेतकरी हा प्रधान घटक होता. किंबहुना जोतीरावांच्या लिखाणात सर्वत्र शेतकऱ्यांच्या संदर्भात अनेकप्रकारचे विवेचन आढळून येते. १९ व्या शतकामध्ये बहुसंख्य समाज शेती व्यवसायावर अवलंबून होता आणि त्यांचे शोषण भट भिक्षुकांच्याकडून होत होते हे सूत्र जोतीरावांच्या लिखाणात पहावयास मिळते. त्यामुळे स्त्री, अस्पृश्य आणि शेतकरी यांची १९ व्या शतकातील स्थिती समजावून घ्यावयाची असेल तर जोतीरावांनी जे लेखन केले त्याचा संक्षिप्तपणे परामर्श घेणे यास पर्याय उरत नाही. या शोषीत घटकांच्या अंगी चैतन्य निर्माण व्हावे, आपण कसे नाडले जातो याची त्यांना जाणीव व्हावी आणि या गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठीचा मार्ग मिळावा यासाठीचे मार्गदर्शन जोतीरावांनी आपल्या लिखाणातून केले आहे. मानवतावादाचा प्रचार व्हावा आणि सर्व मानव समान असून त्यांच्यात कोणताही भेदभाव असूच शकत नाही हे त्यांना आपल्या लिखाणातून स्पष्ट करावयाचे होते. जे काही कृत्रीम भेदाभेद निर्माण केलेले होते आणि त्याबरहुकूम समाजव्यवस्था चालू होती त्यामध्ये उच्चवर्णीयांचा स्वार्थ कसा होता हे जोतीरावांना सिध्द करून दाखवावयाचे होते. यासाठी जोतीरावांनी लिखाण केले. त्याचे सार संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) <u>तृतीय रत्न</u> :

" भटजोशी आपल्या मतलबी धर्माच्या थापा देऊन अज्ञानी शूद्रास कसकसे फसवून खातात व ख्रिस्ती उपदेशक आपल्या नि:पक्षपाती धर्माच्या आधाराने अज्ञानी शूद्रास खरे ज्ञान सांगून कसकसे सत्य मार्गावर आणतात, "[१] यासाठी जोतीरावांनी १८५५ ला हे नाटक लिहिले." १८५५ सालात दक्षणा प्राईज कमिटीस अर्पण केले. परंतु तेथील मिडस्थ भट सभासदांच्या आग्रहामुळे युरोपीयन सभासदांचे काही चालेना तेव्हा त्या कमीटीने माझी चोपडी नापसंत केली "[२] असे जोतीरावांनी म्हटले आहे.

नाटकाच्या सुरुवातीसच जोतीराव उद्देश स्पष्ट करताना लिहितात, " प्रथम माझ्या कुणब्याचे मूल ते आईच्या उदरात कोठे गर्भी वास करू लागल्याचा आरंभ होत आहे तोच ब्राह्मण जोशाची स्वारी येऊन त्या गरीब बाईस मोठमोठ्या हुलथापी देऊन तिजला द्रव्यहीन कसकशी करितो याविषयी मी येथे लिहीन."[३]

या नाटकाची मध्यवर्ती कल्पना अशी आहे की, एक ब्राह्मण भिक्षुक एका खेड्यात फिरत असता एका शेतकऱ्याच्या गरोदर पत्नीस पाहतो. तो तिला सांगतो की, तुझ्या भावी मुलाचा जन्म तुझ्या नवऱ्याला घातक ठरणार आहे. हे भविष्य कथन ऐकून ती भेदरून जाते. तो ब्राह्मण भिक्षुक तिला सांगतो की हे संकट दूर व्हावे म्हणून तुझ्या कुटुंबीयाच्यावतीने मी देवाची प्रार्थना करतो. असे म्हणून तो तिचे सांत्वन करतो. त्याची सूचना ती मान्य करते. ही प्रार्थना चाललेली असताना एक ख्रिस्ती धर्मोपदेशक तेथे योगायोगाने येतो. वादविवादास प्रारंभ होतो. ब्राह्मणाची लबाडी उघडकीस येते.

" जोतीरावांनी शेवटी या चर्चेपासून असा निष्कर्ष काढला की, मूर्तिपूजेपेक्षा ज्ञान हे श्रेष्ठ होय. जोतीरावांनी शेवटी तो शेतकरी आणि त्याची पत्नी यांना आपण खास काढलेल्या प्रौढांच्या रात्रशाळेत शिकावयास जाण्याचा उपदेश केला."[४]

२) छत्रपति शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा :

१८६९ साली लिहिलेल्या या पवाडयाचे जोतीरावांनी आठ भाग केले आहेत. " हरस्क भागात विषयांतर होऊ नये या भयास्तव सर्व भाग स्कसारखे केले नाहीत. अति जुनाट यवनी व मेसर्स ग्रांडफ, मरी वगैरे इंग्रज लोकांच्या बहुतेक लेखी आधारावरून हा पवाडा केला आहे. कुणबी, माळी, महार, मांग वगैरे पाताळी घातलेल्या लोऱ्यांच्या उपयोगी हा पवाडा पडावा असा माझा हेतु आहे." असे जोतीरावांनी स्पष्ट केले असून पुढे ते लिहतात " लांबच लांब मोठाले संस्कृत शब्द मुळीच घातले नाहीत व जेथे माझा उपाय चालेना तेथे मात्र लहान स्हान शब्द निर्वाहापुरते घेतले आहेत. माळी कुणब्यास समजण्याजोगी सोपी भाषा होण्याविषयी फार श्रम करून त्यांस आवडण्याजोग्या चालीने रचना केली आहे."[५] यावरून हा पवाडा खास लक्ष्य घटक डोळ्यांसमोर ठेवून जोतीरावांनी लिहला होता हे स्पष्ट होते. कारण " महाराजांच्या अंगी गुणांची पारख, परिश्रम करण्याची जिद्द, स्वदेशाभिमान, अपार बुध्दीमत्ता, निगर्वी स्वभाव, चतुरता, अखंड उद्योगी स्वभाव, मुत्सद्देगिरी, स्नतेचा पुरस्कर्ता, फितुरांचा काळ, रयतेचा सखा इत्यादी स्वरूपाचे जे विशेष पैलू होते त्याची माहिती"[६] त्यांना व्हावी आणि त्या गुणांची कास त्यांनी पकडावी अशी जोतीरावांची मनोकामना होती.

३) ब्राह्मणांचे कसब :

१८६९ ला हे लहानसे पुस्तक जोतीरावांनी लिहले. या पुस्तकात शूद्रातिशूद्रांचे होणारे शोषण स्पष्ट करताना आपले दु:ख कुठेतरी उघडेपणाने व्यक्त करावे म्हणून हे सर्व जोतीराव देवास सांगत आहेत.. देवाची विणवणी करताना जोतीराव लिहतात -

" तूं सागर करूणेचा देवा तुजलाचि दु:ख सांगावे ।
तुजवांचुन इतरातें दिनमुख पसरोनि काय मागावें ।।"[७]

हे पुस्तक जोतीरावांनी महाराष्ट्र देशांतील कुणबी, माळी, मांग, महार यांना अर्पण केले आहे.[८]

या पुस्तकाचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले आहे की, " ब्राह्मण आपला कावा सर्व जातींच्या लोकांशी सारखा चालवीत नाहीत. कुणबी, माळी वगैरे शुद्र लोकांत त्यांचे मटपण फार चालते....अशा लोकांस त्यांच्या बंधनातून सोडवावे "[९] म्हणून आणि इंग्रजानी त्यांना विद्या शिकवावी यासाठी हे लिहले आहे.

जोतीरावांनी हिंदुस्थानात ब्राह्मण सत्ताधारी होण्यापूर्वी आणि सत्ताधारी झाल्यानंतरची परिस्थिती,[१०] ब्राह्मण जोशी - शूद्राच्या घरी मूल जन्मले म्हणजे घेऊन पैसा कसा उपटतो,[११] शूद्राच्या लग्नात शूद्रास कसा बुचाडतो,[१२] शूद्राच्या घरात कुशांतीच्या वेळी अनुष्ठान वगैरे करून तूपपोळ्यांची कीड कशी उडवितो व दक्षिणा कशी घेऊन जातो,[१३] शूद्राने घर बांधले म्हणजे घरभरणीच्या वेळी आपण ताजा स्वयंपाक खाऊन उरलेला शिळा पाक धरधण्यास ठेवून कसा जातो.[१४] शूद्राच्या घरी पोथी वाचायाचे निमित्ताने शिरून त्याच्या संसार खटल्यात हात घालून त्यास कसा बुडवितो,[१५] शूद्राच्या अंतकाळी ब्राह्मण वैद्य भटजी व कारटा बनून त्याच्या बायकोस क्रूरपणे कसा नाडितो,[१६] शूद्रास प्रतिवर्षी भाद्रपदमासी पक्षांत व वर्षांतील साधारण सणावारांत व सूर्यचंद्राच्या ग्रहणकाळी कशा भुलथापा देऊन बुडवितो,[१७] अतिलोभ तृप्त करून घेण्यासाठीची ठकबाजी[१८] इत्यादी बाबत मर्मग्राही वर्णन केले आहे.

जोतीरावांनी वर्णन केलेले ' ब्राह्मणांचे कसब ' योग्य कसे आहे याबाबत बाबा पद्मनजी यांचा अभिप्राय (' सत्यदीपिका ' वर्ष १०, अंक १, १ जानेवारी, १८७०) या पुस्तकाचे महत्व सांगण्यास समर्थ आहे. बाबा पद्मनजी लिहितात," रा. जोतिबांनी ब्राह्मणाच्या कसबाचे यथार्थ

वर्णन केलेले आहे. त्यात काही अतिशयोक्ती नाही. ज्यांस भटपणाची फारसी माहिती नाही व ज्यांचे वागणे कुणबी, माळी लोकांत नाही त्यांस कदाचीत या पुस्तकात कवीने आपले कसब चालविले आहे असे वाटेल परंतु आम्हास जी काही भटपणाची माहिती आहे त्यावरून तर हे खरोखर ब्राह्मणाचेच कसब वर्णिले आहे असे वाटते."[१९] यामधून समाज जागृती आणि शोषणाविरूध्दचा लढा उभा करण्यास वातावरण निर्माण होईल अशी अपेक्षा जोतीरावांची होती.

४) गुलामगिरी :

जोतीरावांचा हा ग्रंथ १८७३ ला प्रकाशित झाला. या ग्रंथाचा मुख्य उद्देश स्पष्ट करताना जोतीराव सांगतात, " आज शेकडो वर्षे शूद्रादि अतिशूद्र, ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून सतत दुःखे सोशीत आहेत व नाना प्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत, तर या गोष्टीकडेस त्या सर्वांचे लक्ष लागून त्यांनी तिजविषयी निट विचार करणे व येथून पुढे भटब्राह्मण लोकांचे अन्यायी जुलमापासून आपली सुटका कशी करून घेणे हाच आहे."[२०]

भटब्राह्मणाच्या गुलामगिरीतून शूद्रादि शूद्रांची सुटका व्हावी हा जोतीरावांचा प्रामाणिक हेतू असल्याने त्याविषयीचा मार्ग जोतीरावांनी अर्पणपत्रिकेत दाखवून दिला आहे. गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी " युनैटेड स्टेट्स मधील सदाचारी लोकांनी गुलामांस दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामांत औदार्य, निरापेक्षता व परोपकार बुध्दी दाखविली यास्तव त्यांच्या स्मरणार्थ "[२१] परम प्रितीने अर्पण केला असून " माझे देश बांधव त्यांच्या त्या स्तुत्य कृत्याचा कित्ता, आपले शूद्रबांधवास ब्राह्मणलोकांच्या दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामांत घेतील."[२२] अशी आशा बाळगली आहे.

या ग्रंथात जोतीरावांनी देशातील ब्राह्मण वर्चस्वाचा इतिहास आणि इंग्रजी राजवटीतील अत्याचार या दोहोंचाही समाचार घेतला आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्वे आग्रही पध्दतीने या ग्रंथात जोतीरावांनी मांडली असून त्याच्या प्रस्थापनेसाठी शूद्रादी शूद्रांच्या शिक्षणाची सोय झाली पाहिजे असा आग्रह धरला आहे. इंग्रजी राजवटीतही इंग्रजांना इथल्या बारिकसारिक गोष्टींची माहिती नसल्याने ब्राह्मणच खरे सत्ताधिश राहिले. शूद्रादि शूद्रांची मानसिक गुलामगिरी कायमच राहिलेली आहे यांकडे लक्ष वेधताना जोतीराव लिहितात, " या देशात इंग्रज सरकार आल्यामुळे शूद्रादि अतिशूद्र,भटाच्या कायिक दास्यत्वातून मुक्त झाले खरे, परंतु आम्हास सांगण्यास मोठे दु:ख वाटते की, अद्यापि आमचे दयाळू सरकारचे शूद्रादि अतिशूद्रांस विद्या देण्याविषयी दुर्लक्ष असल्यामुळे ते अज्ञानी राहून भटलोकांचे बनावट ग्रंथांच्या संबंधाने त्यांचे मानसिक दास झालेले आहेत व त्यांस सरकारजवळ दाद मागण्याचे त्राण राहिले नाहीत. भट लोक त्या सर्वांस एकंदर सर्व प्रापंचिक सरकारी कामात किती लुटून खातात, याजकडेस आमचे सरकारचे मुळीच लक्ष पोहचले नाही, तर त्यांनी दयाळू होऊन या गोष्टीकडेस नीट रीतीने लक्ष पुरवावे व त्यांस भट लोकांचे मानसिक दास्यत्वातून मुक्त करावे." [२३]

या पुस्तकाच्या शेवटी चार पद्यात्मक प्रकरणे जोडली आहेत. त्यामध्ये गुलामगिरीच्या मुक्ततेचे उपाय सापडतात. उदाहरणादाखल नोकरशाहीकडून होणारी छळवणूक थांबावयाची असेल तर -

" एक जातीचे सर्व मिळूनी नाडीती । बाकीचे तोंडाकडे पाहती ।।

असे घडू नये म्हणून

सर्व जाती निवडून । घ्याव्या संख्या प्रमाण ।।

द्यावी कामे नेमून । होईल सुख साधन ।। [२४]

असे जोतीराव सुचवतात.

तसेच विद्या शूद्रांना द्यावी याबाबत जोतीराव सुचवतात -

सत्तेच्या मदानें विद्या बंद केली । शूद्रांही मानिली ।
बंदि सदा ।।
मनु तो जळाला इंग्रजी बा झाला । ज्ञानाची माऊली ।
पान्हा पाजी
आतां तरी तुम्हीं मार्ग घेऊ नका । धि:काऱ्नी टाका ।
मनूमतां
विद्या शिकताच पावाल ते सुख । घ्यावा माझा लेख ।
जोती म्हणे ।। [२५]

५) शेतक-याचा असूड :

शूद्र शेतक-यांचे बचावाकरिता हे पुस्तक १८८३ ला जोतीरावांनी प्रसिध्द केले. " शूद्र शेतकरी हल्ली इतक्या दैन्यवाण्या स्थितीस येऊन पोहचण्याची धर्म व राज्यसंबंधी कारणे आहेत, त्यापैकी थोड्या बहुतांचे विवेचन करण्याच्या हेतूने " हा ग्रंथ लिहला गेला. " शूद्र शेतकरी बनावट व जुलमी धर्माचे योगाने एकंदर सर्व सरकारी खात्यानी ब्राह्मण कामगारांचे प्राबल्य असल्याने भटभिक्षुकांकडून व सरकारी युरोपियन कामगार ऐषारामी असल्याचे योगाने, ब्राह्मण कामगारांकडून नाडले जातात. त्यांपासून त्यांस या ग्रंथावलोकनाचे योगाने आपला बचाव करता यावा असा हेतू "[२६] शेतक-याचा असूड लिहताना जोतीरावांचे मनी होता. ही अवस्था संपून शेतकरी संपन्नावस्थेत यावयाचा असेल तर त्यास विद्या दिली पाहिजे. कारण विद्याहीनता हे त्याच्या दु:स्थितीचे महत्वाचे कारण आहे. याचे वर्णन जोतीराव करतात -

" विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली,
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले । "[२७]

शेतक-यांचे अज्ञान दूर करण्याबरोबरच शेती सुधारणा करण्याबाबतही जोतीरावांचा निकोप दृष्टीकोन पहावयास मिळतो. " शेतक-याचा असूड " हा जोतीरावांचा ग्रंथ अनेक दृष्टीनी अपूर्व आहे. या ग्रंथात त्यांनी शेतक-याच्या अवनत स्थितीचे विदारक चित्र रेखाटून त्या अवनत स्थितीची मूलगामी मिमांसा केली आहे. आणि ती सुधारण्यासाठी सर्वांगीण उपाययोजनाही सुचविली आहे. जमिनीची सुधारणा कशी करावी, धरणे, पाटबंधारे कोठे बांधावे, गुरांची उत्तम निपज कशी करावी, जमिनीची धूप थांबविण्यास काय करावे, शांततेच्या काळात शेती सुधारणेच्या विधायक कार्यासाठी सैनिकांचा उपयोग कसा करता येईल, अन्य सुधारलेल्या राष्ट्रात शेती कशी केली जाते, याचे शिक्षण देऊन भारतीय शेतक-यांच्या मुलांना परदेशात पाठवून आणणे कसे आगत्याचे आहे, शेतकीची वार्षिक प्रदर्शने भरवून उत्तम पीक काढणा-या शेतक-यास पारितोषिके देणे कसे उपकारक ठरणार आहे, यांसारख्या विधायक सूचनांबरोबरच शेतातून चो-या झाल्यास पोलिसांना दंड का केला पाहिजे, बाढीदिढी करणा-या सावकार-व्यापा-यांवर करडी नजर कशी ठेवली पाहिजे, ब्रिटीश मांडवलदारांचे कर्जाच्या सवा व्याज का बंद केले पाहिजे, शेतीस अवश्य असलेल्या पशुधनाच्या रक्षणासाठी गोवधबंदी कशी आवश्यक आहे, शेतक-यांच्या मुलांचा नैतिक अध:पात होऊ नये म्हणून कोणत्या उपययोजना केल्या पाहिजेत, अशांसारख्या संरक्षक सूचनाही या ग्रंथात अनेक आहेत. या सूचनांतील अनुभवी सूक्ष्मपणा ध्यानात घेतला, म्हणजे जोतीरावांच्या पारदर्शक दृष्टीचा पुरेपूर प्रत्यय येतो." [२८]

६) सत्सार :

१८८५ ला सत्सारचे दोन अंक जोतीरावांनी प्रसिध्द केले. पहिल्या अंकाचा उद्देश स्पष्ट करताना जोतीराव सांगतात, " इंग्रज बाहादरचे राज्याच्या प्रतापाने अज्ञानी शूद्रादि अतिशूद्रांस तरक्क तरक्क लिहता

वाचतां येऊं लागले आहे, म्हणून आज हजारो वर्षापासून धूर्त आर्यांकडून शुद्रादि अतिशुद्र यांचेकडून नाडले जातात, याविषयी सत्सार या नावाचे छोटेखानी पुस्तकांत नित्य वाटाघाट करून जगदृष्टया आर्य ब्राह्मणांची खात्री करावी, म्हणून हा पहिला अंक वाचकांपुढे आणला आहे."[२९] या अंकात जोतीरावांनी " ब्राह्मण समाज व प्रार्थना समाज यांची भूमिका, भिन्न जातींतील स्त्री-पुरुषांच्या संबंधातून जन्मलेल्या संततीचे सामाजिक स्थान आणि आर्य भटांची धर्मकल्पना या तीन प्रश्नांची चर्चा केली आहे."[३०]

सत्सारच्या २ अंकात " स्त्रियांस तुरळक तुरळक लिहितां वाचतां येऊं लागलें आणि तेणेंकरून आज हजारों वर्षांपासून आर्य धूर्त जनांकडून एकंदर सर्व स्त्रियांचा सर्वोपरी छळ झाला व हल्ली होत आहे, ही सर्व पुरुषांची ठकबाजी, स्त्रिया डोळ्यासमोर ठेवून आणून मांडण्याचा "[३१] प्रयत्न केला आहे.

७) इशारा :

१८८५ साली प्रसिध्द झालेल्या या पुस्तिकेत जोतीरावांनी दोन प्रश्न उपस्थित केले असून त्यांचा संदर्भ न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी मे १८८५ ला " शेतकीची स्थिती " या विषयावर केलेल्या भाषणाशी आहे.[३२] न्या. रानडे यांनी " तीस वर्षांपेक्षा हल्ली शेतकीची स्थिती चांगली आहे " असे विधान केले होते. या विधानाचे खंडन ` इशारा ` मध्ये जोतीरावांनी केले आहे.

पहिला प्रश्न उपस्थित करताना जोतीराव लिहतात -

" जिस तन लागे वहि तन जाने ।
बीजा क्या जाने गव्हारा रे ।।"[३३]

यामुळे शेतक-यांच्या दु:खाची, हलाखीची जाणीव " आर्य ब्राह्मणातील पहिल्या दिवामाता " स येणार कशी ? हा जोतीरावांचा सवाल आहे. कारण त्यांनी शेतीत कधी कामच केलेले नाही. याचे वर्णन इशाराच्या उपोद्घातात केले आहे. " एकातरी ब्राह्मणाच्या कुटुंबातील बायकामुलास, आम्हा शूद्र शेतक-यांचे बायकांमुलांसारखें उन्हांतान्हांत उपाशीतापाशी शेती कामे करण्याचा ढंग माहित आहे काय ? या सर्व भट ब्राह्मणांतील एकाने तरी सोनखताच्या पाटया वाहून झाडांच्या खोडाशीं टाकल्या आहेत काय ? "[३४] असे नसेल तर अशी विधाने करून सर्वसामान्य लोकांच्या बुद्धीभेद करण्याचा त्यांना अधिकारच काय ? हा पहिला सवाल जोतीरावांचा आहे.

जोतीरावांचा दुसरा प्रश्न शेती सुधाराच्या संदर्भात आहे. शेतक-यांची स्थिती सुधारली असे सरसकट विधान करणे म्हणजे वस्तुस्थिती दडपण्याचा प्रकार जोतीरावांना वाटतो. कारण शेती सुधाराचा प्रश्न शेतीशी संबंधित सर्व घटकांना एकत्रीत डोळ्यासमोर ठेवून केला पाहिजे. त्यामुळे " पूर्वीच्या तीस वर्षांपेक्षा हल्ली शूद्र शेतक-यांची स्थिती बरी आहे " असे सर्वसाधारण विधान करणे म्हणजे "पूर्वीचे गायागुरांचे कळप वळणा-या, वल्कलें नेसून पर्णकुटीत वास करणा-या, कंदमुळांवर निर्वाह करून जंगलोजंगली भटकत फिरणा-या आर्यभट ब्राह्मणांपेक्षां हल्लीचे भिल्ल, कोळी, मांग व महाराची स्थिती फार नामी आहे, असे म्हणण्यासारखे आहे. "[३५] असे जोतीराव उपरोधिकतेच्या स्वरात सांगतात.

८) सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक :

जोतीरावांच्या मृत्यूनंतर म्हणजे १८९१ ला हे पुस्तक प्रसिध्द झाले. या पुस्तकात जोतीरावांनी सुख, धर्मपुस्तक, निर्माणकर्ता, पूजा, नामस्मरण, नैवेद्य अथवा अन्नदान, अनुष्ठान, स्वर्ग, स्त्री-पुरूष, पाप, पुण्य, जातीभेद, पशुपक्ष्यादि वगैरे आणि मानव प्राणी यांजमध्ये भेद, धर्म, निति, तर्क,

दैव, आर्य भटब्राह्मणांचे वेद आणि सर्वजनिक सत्याची तुलना, सत्य, आकाशांतील ग्रह, जन्म, कन्या अथवा पुत्र यांचे नावाचा संस्कार, अन्नाचा संस्कार आणि शाळेचा संस्कार, लग्न, दुष्टाचरण, मृत्यू, प्रेताची गति, श्राध्द, एकंदर सर्व स्त्री पुरूषांस ग्रंथकर्त्याची प्रार्थना अशा विविध विषयांवर आपली मते स्पष्टपणे मांडली आहेत. हा सर्व प्रपंच मानवधर्म समजावून सांगण्यासाठी त्यांनी केला आहे. याबाबतची जोतीरावांची भूमिका अशी आहे. " आपल्या अमर्याद विस्तीर्ण पोकळीमध्ये निर्मिकाने अनंत सूर्यमंडळासह त्यांच्या ग्रहोपग्रहांसमित तत्संबंधी एकंदर सर्व प्राणिमात्रांस उत्पन्न केले आहे. त्यापैकी आपण सर्व मानव स्त्री पुरूषांनी त्यांविषयी कायकाय करावे आणि आपण सर्व मानव स्त्री पुरूषांनी त्याचे स्मरण मनी जागृत ठेवून एकमेकांशी कोणत्या तऱ्हेने आचरण केल्यामुळे त्यास आनंद होणार आहे, यास्तव मी त्याच्या कृपेने एकंदर सर्व मानव व स्त्री पुरूषांच्या हितासाठी हा लहानसा ग्रंथ रचिला आहे. तो सर्वांस प्राप्त होऊन आम्ही सर्वांनी निर्मिकाच्या सत्यमय राज्याचा सारखा उपभोग घेऊ लागावे म्हणून माझी त्यापाशी मागणी आहे."[३६]

या पुस्तकात जोतीराव सत्य धर्म सांगतात. सत्य धर्म म्हणजे मानवधर्म, मानवतावाद होय ही त्यांची भूमिका आहे. " जसे माणसांची तुम्हांशी वर्तावे म्हणून तुमची इच्छा आहे. तसेच तुम्हीही त्यांशी वर्ता हाच खरा धर्म होय " ही त्यांची भूमिका आहे. सार्वजनिक सत्य धर्म अस्तित्वात यावयाचा असेल तर त्यासाठी सत्यवर्तन आवश्यक आहे हे जाणून सत्यवर्तनाचे ३३ नियम जोतीरावांनी सांगितले आहेत.[३७] त्यावरून जोतीरावांचा सार्वजनिक सत्यधर्म म्हणजे दुसरे तिसरे काही नसून मानवतावाद हाच सत्यधर्म आहे हे स्पष्ट होते.

९) अखंडादि काव्यरचना :

ही जोतीरावांची एक विशेष अशी पद्यरचना आहे. मानवनिर्मित भेदाभेदांना तिलांजली दिली गेली पाहिजे ही या काव्यरचनेची मध्यवर्ती कल्पना आहे. " अखंडादी काव्यरचनेत विभाग २ आणि ३ मध्ये सांगितलेल्या गोष्टींचा विचार हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता. परंतु भाग १ मध्ये मानवधर्म आणि त्या संबंधातील अटींचा त्यांनी केलेला ऊहापोह चिंतनशील स्वरूपाचा आहे."[३८] अखंडादी काव्यरचनेतील काही उदाहरणे पुढे नमुन्यादाखल उद्धृत केली आहे त्यावरून या काव्यरचनेतील विचार स्पष्ट होण्यास मदत होईल.

१) सर्वांचा निर्मिक आहे एक धनी । त्याचे भय मनीं ।
धरा सर्व ।। १ ।।[३९]

२) मानव सारिखे निर्मीके निर्मीले । कधी नाही केले ।
कोणी एक ।। १ ।।[४०]

३) मानवांचे धर्म नसावे अनेक । सत्याने वर्तावें ।
ईशासाठी ।। ३ ।।[४१]

४) जप अनुष्ठाने स्त्रिया मुलें होती । दुजा कां करीती ।
मुलांसाठी ।। १ ।।[४२]

५) स्त्री पुरुषांसाठी शाळा त्या घालाव्या । विद्या शिकवाव्या ।
भेद नाहीं ।। ३ ।।[४३]

६) स्त्री पुनर्विवाह करण्याची बंदी । अन्यायाचे धुंदी ।
थांग नाही ।। १ ।।[४४]

७) सत्य निर्मीकास शोधल्यावांचून । थोतांडि कल्पून ।
ग्रंथ केले ।। १ ।।[४५]

८) कल्पनेचे देव कोरीले उदंड । रचीले पाखांड ।
हितासाठी ।। १ ।।[४६]

९) स्वर्गाची शांतता कल्पून मनांत । लिहिली ग्रंथात ।
तर्क बळे ।। १ ।।
कोठे आहे स्वर्ग पाहिले ते कोणी । भिऊं नका मनीं ।
दावा आम्हा ।। २ ।।[४७]

संपूर्ण काव्यरचनेत अनेकविध विषयांवर जोतीरावांनी मर्मग्राही विवेचन केले आहे. तात्पर्य हे की लोकांचे प्रबोधन व्हावे, मानवतावाद अस्तित्वात यावा.

थोडक्यात असे म्हणावे लागेल की जोतीरावांनी केलेले लेखन हे प्रबोधनवादी लेखन आहे. त्यात सामाजिक वास्तवाचे भान आहे. भविष्यकालीन समाजव्यवस्थेची डोळस जाण आहे, ध्येयाची निश्चितता आहे आणि शूद्रादि शूद्रांचे शोषण थांबावे ही कळकळ आहे. त्यांचे लेखन हे दास्यमुक्ती चळवळीचे प्रमुख अंग आहे हे त्यांच्या लेखनातून सुस्पष्टपणे जाणवते. भाषेचा विचार केला तर ती सर्वसामान्यांसाठीची भाषा आहे.

BARR. [illegible] KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

संदर्भ


१) कीर, मालसे - समग्र वाड्.मय, द्वितीयावृत्ती, पृ. १४०.

२) फडके य.दि. - समग्र वाड्.मय, पृ. ३.

३) किता, पृ. ५.

४) कीर धनंजय - पूर्वोक्त, पृ. ८४.

५) समग्र वाड्.मय, पृ. ४१

६) विमूते मालशा - महात्मा फुले विचारधन, पृ. २२

७) समग्र वाड्.मय, पृ. ८५.

८) किता, पृ. ८६.

९) किता, पृ. ८७.

१०) किता, पृ. ८९-९३.

११) किता, पृ. ९३-९४.

१२) किता, पृ. ९४-९५.

१३) किता, पृ. ९५-९६.

१४) किता, पृ. ९६-९८.

१५) किता, पृ. ९८-१०२.

१६) किता, पृ. १०२-१०५.

१७) किता, पृ. १०६.

१८) किता, पृ. १०७.

१९) किता, पृ. ८३.

२०) किता, पृ. १२९.

२१) किता, पृ. ११५.

२२) किता.

२३) किता,पृ. १३८.

२४) किता,पृ. १९०.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

२५) कित्ता, पृ. १९१.

२६) कित्ता, पृ. २५३.

२७) कित्ता.

२८) कित्ता - प्रस्तावना तीस.

२९) कित्ता, पृ. ३५१.

३०) सरदार गबा, पूर्वोक्त, पृ. ८७.

३१) समग्र वाङ्.मय, पृ. ३६९.

३२) कित्ता, पृ. ३८३.

३३) कित्ता, पृ. ३८७.

३४) कित्ता, पृ. ३८६.

३५) कित्ता.

३६) कित्ता, पृ. ४३५.

३७) कित्ता, पृ. ४९८-५०१.

३८) विमूते मालवा, पूर्वोक्त, पृ. १८.

३९) समग्र वाङ्.मय, पृ. ५३५.

४०) कित्ता, पृ. ५५०.

४१) कित्ता, पृ. ५३५.

४२) कित्ता,

४३) कित्ता, पृ. ५३७.

४४) कित्ता, पृ. ५३९.

४५) कित्ता, पृ. ५४१.

४६) कित्ता, पृ. ५४२.

४७) कित्ता, पृ. ५४८.